नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

दैनिक
# यश सिद्धि न्यूज
संपादक : कमलाकर सोनकांबळे
YASH SIDDHI NEWS

वर्ष - २ रे | Year - 2nd | अंक - २८० | Issue - 280 | वार बुधवार दि. २६ फेब्रुवारी २०२५ | Blow- Wednesday Date 26 February 2025 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com | वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ | Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये | Amount - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 | ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

## थोडक्यात...

### शासकीय कर्मचाऱ्यांचे वेतन 'टीजेएसबी' मधूनही; महामंडळांना गुंतवणुकीसाठी परवानगी

मुंबई : शासकीय कर्मचाऱ्यांचे वेतन आणि भत्ते प्रदान करण्यासाठी तसेच महामंडळ, सार्वजनिक उपक्रम यांच्याकडील अतिरिक्त निधी गुंतवणुकीसाठी ठाणे जनता सहकारी बँकेत (टीजेएसबी) खाते उघडण्यास मंगळवारी झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. ही बँक आर्थिकदृष्ट्या सक्षम असून व्यावसायिकतेचे निकष पूर्ण करीत असल्याने हा निर्णय घेण्यात आला आहे.

रिझर्व्ह बँकेने विहित केलेली पात्रता व प्रक्रिया पूर्ण करीत असल्याने सहकार विभागाने केलेल्या शिफारशीनुसार टीजेएसबीमध्ये शासकीय कर्मचाऱ्यांचे वेतन व भत्ते प्रदान करण्यासाठी संबंधित आहरण व संवितरण अधिकाऱ्यांना बँक खाते उघडण्यास मान्यता देण्यात आली. तसेच निवृत्तिवेतनधारकांचे वैयक्तिक बँक खाते उघडण्याकरिता तसेच शासनाच्या सार्वजनिक उपक्रम, महामंडळे यांच्याकडील अतिरिक्त निधी गुंतवणुकीकरिता बँकेस प्राधिकृत करण्यासही मंत्रिमंडळाने मान्यता दिली.

नागरी बँकांच्या लेखापरीक्षण अहवालात बदल होण्याची शक्यता विचारात घेऊन अशा नागरी सहकारी बँकांची यादी दरवर्षी जुलै-ऑगस्ट महिन्यात सहकार खात्याच्या सल्ल्याने सुधारित करण्यासही मंजुरी देण्यात आली आहे. महायुती सरकारने भाजप आमदार प्रवीण दरेकर अध्यक्ष असलेल्या मुंबै बँकेत महामंडळे, सार्वजनिक उपक्रम यांना निधी गुंतवणुकीला मान्यता दिली आहे. यापाठोपाठ आता टीजीएसबी बँकेची निवड करण्यात आली आहे.

# दिल्ली विधानसभेत गदारोळ, १२ आमदार निलंबित

## कॅगचे ताशेरे; अरविंद केजरीवाल सरकारच्या मद्यधोरणात २००२ कोटी बुडाले

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : दिल्ली विधानसभेच्या निवडणुकीत भारतीय जनता पक्षाला मिळालेल्या बहुमतानंतर दिल्लीत भारतीय जनता पक्षाचं सरकार स्थापन झालं, तर आम आदमी पक्षाला मोठ्या पराभवाला सामोरं जावं लागल्यामुळे दिल्लीत 'आप' विरोधी पक्षाच्या भूमिकेत आहे. नवीन सरकार स्थापन झाल्यानंतर सोमवारपासून दिल्लीत विशेष अधिवेशन सुरु झालं आहे. या अधिवेशनाच्या पहिल्या आणि दुसऱ्या दिवशी मोठा गदारोळ पाहायला मिळाला. दिल्लीच्या मुख्यमंत्री रेखा गुप्ता यांच्या कार्यालयामधून शहीद भगतसिंग आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे फोटो हटवल्याचा दावा विरोधी पक्षनेत्या अतिशी यांनी केला. यावरून चांगलंच राजकारण तापलं. यातच आज (२५ फेब्रुवारी) दिल्ली सरकारने कॅगचा अहवाल विधानसभेत सादर केला आहे.



या अहवालात 'आप' सरकारच्या कारभाराच्या संदर्भात मोठा खुलासा करण्यात आला आहे. यामध्ये शीशमहल, मोहल्ला क्लिनिक, मद्य धोरणासह आदी महत्वाच्या गोष्टी मांडण्यात आल्या आहेत. दिल्लीत आम आदमी पक्षाचं सरकार सत्तेत असताना मद्य धोरणाच्या अंमलबजावणीमुळे तब्बल २००२ कोटींचा महसूल बुडाल्याचा दावा या अहवालात करण्यात आला आहे. मद्य धोरणाच्या अंमलबजावणीमुळे २००२ कोटी रुपयांचं नुकसान झाल्याचं कॅगच्या अहवालात नमूद करण्यात आलं आहे. दिल्लीच्या मुख्यमंत्री रेखा गुप्ता यांनी हा अहवाल दिल्ली विधानसभेत आज सादर केला. या संदर्भातील वृत्त इंडिया टुडेनी दिलं आहे.

मद्य धोरणामध्ये पूर्वी एका व्यक्तीला एक परवाना मिळत असे. मात्र, नव्या धोरणात एका व्यक्तीला एकापेक्षा जास्त परवाने मिळू शकत होते. तसेच आप सरकारच्या चुकीच्या निर्णयांमुळे दिल्ली सरकारचे असे नुकसान झाल्याचं अहवालात म्हटलं आहे. कॅगच्या अहवालात असं म्हटलं आहे की, झोनल परवाने जारी करण्यात शिथिलता दिल्यामुळे सरकारचे अंदाजे ९४० कोटी रुपयांचे नुकसान झाल्याचंही अहवालात म्हटलं आहे.

दरम्यान, तत्कालीन आम आदमी पार्टी (आप) सरकारने दिल्ली दारू धोरण लागू केल्यानंतर सरकारवर मोठी टीका झाली होती. तसेच आम आदमी पार्टीवर भ्रष्टाचाराचे आरोप झाले होते. त्यानंतर अखेर अरविंद केजरीवाल यांच्या तत्कालीन सरकारने हा निर्णय माघे घेतला होता. मात्र, याच प्रकरणात केंद्रीय अन्वेषण ब्युरो (उइख) आणि अंमलबजावणी संचालनालय (एऊ) यांनी दाखल केलेल्या प्रकरणात अरविंद केजरीवाल आणि मनीष सिसोदिया यांच्यासह काही 'आप'च्या नेत्यांना अटक झाली होती.

'आप'च्या १२ आमदारांचं एक दिवसासाठी निलंबन

दिल्ली विधानसभेत गदारोळ करणाऱ्या जुबेर अहमद, वीरेंद्र सिंह कादियान यांच्यासह विरोधी पक्ष नेत्या आतिशी अशा एकूण १२ आमदारांचं एक दिवसासाठी निलंबन करण्यात आलं आहे. दिल्ली विधानसभेत आज कॅगचा अहवाल सादर करण्यात आला. या अहवालात शीशमहलच्या दुरुस्ती आणि देखभाल खर्चाचे तसंच नुतनीकरणाच्या खर्चाचे तपशील आहेत. ज्यावरुन कॅगने आधीच्या सरकारला झापलं आहे. त्यावरुन 'आप'च्या आमदारांनी हंगामा केला. तसंच दिल्ली विधानसभेत डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचा फोटो हटवून पंतप्रधान मोदींचा फोटो त्या ठिकाणी लावण्यात आला. या दोन्ही मुद्द्यांवरुन माजी मुख्यमंत्री आणि विरोधी पक्षनेत्या आतिशी यांनी भारतीय जनता पक्षावर जोरदार टीका केली.

# पालिका निवडणुकांची सुनावणी पुन्हा लांबणीवर; ४ मार्चला सर्वोच्च न्यायालयात सुनावणी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : राज्यातील प्रलंबित स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीसंदर्भातील याचिकांची सुनावणी सर्वोच्च न्यायालयात पुन्हा लांबणीवर पडली. पुढील सुनावणी मंगळवारी (४ मार्च) होईल. सुनावणीनंतर निकाल लागल्यावर निवडणुकांची तयारी करण्याकरिता किमान ९० दिवसांचा कालावधी लागू शकतो, असे निवडणूक आयोगाच्या उच्चपदस्थांचे म्हणणे आहे. यामुळेच महानगरपालिकांच्या निवडणुका पावसाळ्यापूर्वी होतील का, याबाबत साशंकता व्यक्त केली जात आहे. ओबीसी आरक्षणासंदर्भात राहुल वाघ तसेच प्रलंबित स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका त्वरित घेण्यात याव्यात, अशी विनंती करणाऱ्या याचिका पवन शिंदे व इतरांनी सर्वोच्च न्यायालयात सादर केलेल्या आहेत.

या याचिकांवरील सुनावणी न्यायमूर्ती सूर्यकांत व न्यायमूर्ती एन. के. सिंग यांच्या खंडपीठापुढे मंगळवारी (२५ फेब्रुवारी) ठेवण्यात आली होती. पण हे प्रकरण



सकाळच्या सत्रात सुनावणीस आले नाही. दुपारच्या सत्रात न्यायिक कामासाठी हे खंडपीठ उपलब्ध नसल्याने या प्रकरणाची सुनावणी तातडीने घेण्यात यावी, अशी विनंती याचिकाकर्त्यांचे वकील ॲड. देवदत्त पालोदकर व राज्य शासनाच्या वतीने सॉलिसिटर जनरल तुषार मेहता यांनी सर्वोच्च न्यायालयास केली.

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका सर्वोच्च न्यायालयाच्या स्थगितीमुळे प्रलंबित आहेत, असे न्यायालयाच्या निदर्शनास आणून देण्यात आले. याचिकाकर्त्यांतर्फे ॲड. देवदत्त पालोदकर, ॲड. अभय अंतुरकर, ॲड. शशीभूषण आडगावकर तर राज्य शासनाच्या वतीने सॉलिसिटर जनरल तुषार मेहता काम पाहत आहेत.

# गतिमान योजनांसाठी विदा प्राधिकरण ; प्रकल्पांच्या प्रभावी अंमलबजावणीकरिता धोरणास मंजुरी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : राज्य शासनाच्या विविध विभागांकडील माहितीच्या प्रभावी वापरासाठी महाराष्ट्र राज्य विदा (डेटा) धोरणाच्या मसुद्यास राज्य मंत्रिमंडळाने मंगळवारी मंजुरी दिली. त्याअनुषंगाने योजना व प्रकल्पांच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी 'महाराष्ट्र इस्टिट्यूशन फॉर ट्रान्सफॉर्मेशन' (मित्रा) संस्थेअंतर्गत राज्य विदा (डेटा ) प्राधिकरण स्थापन करण्यात येणार आहे.

शासनाच्या विविध ३९ विभागांची संगणकीकरणामुळे मोठ्या प्रमाणात माहिती एकत्र होते. ही विदा पूर्ण क्षमतेने कशी वापरता येईल, याचा या धोरणात विचार करण्यात आला आहे. शासनाचे विविध विभाग, शैक्षणिक संस्था, संशोधन संस्था तसेच उद्योगांकडील ही माहिती नव्या धोरणामुळे एकत्रित उपलब्ध होणार असून त्यामुळे कार्यक्षम आणि पारदर्शकपणे प्रशासकीय प्रक्रिया राबविता येणार आहे. या विदा वापराबाबत एकवाक्यता निर्माण करणे तसेच विविध विभागांच्या विदाचे सार्वजनिक वापराकरिता सुलभ अदान-प्रदान करणे या धोरणामुळे शक्य होणार आहे.

विदा धोरणाच्या माध्यमातून प्रत्येक



विभागाची सांख्यिकी माहिती बिनचूक आणि सुसंगत उपलब्ध होणार आहे. विदा धोरणामुळे ग्रामीण भागात काम करणारे नागरी सुविधा कर्मचारी, अंगणवाडी सेवक तसेच कृषी सहाय्यक यांना वेळोवेळी सांख्यिकी माहिती गोळा करावयाचा भार कमी होणार आहे. तसेच या कर्मचाऱ्यांना त्यांच्या मूळ कामावर अधिक लक्ष देता येणार आहे. या धोरणाच्या अंमलबजावणीसाठी महास्ट्राईड हा प्रकल्प कार्यरत असून त्यास जागतिक बँकेने अर्थसहाय केले आहे. प्रकल्पांच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी हे धोरण तयार करण्यात आले आहे.

आदिवासी समाजाला मुख्य प्रवाहात आणण्यासाठी विविध योजनांची अंमलबजावणी सुरू आहे. उद्योगांचे सामाजिक दायित्व (सीएसआर) निधीच्या माध्यमातून समतोल विकास साधला जाईल, अशी ग्वाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मंगळवारी दिली. आदिवासी विकास विभाग आणि संयुक्त राष्ट्र विकास कार्यक्रम (यूएनडीपी) द्वारे सह्याद्री अतिथीगृह येथे परिषद आयोजित करण्यात आली होती. आदिवासी समाजाला शिक्षण व आरोग्य सेवा जलदगतीने उपलब्ध होणे आवश्यक आहे. समाजातील मुलांना उच्च दर्जाचे शिक्षण व नैसर्गिक गुणवत्तेला योग्य व्यासपीठ मिळावे, यासाठी नामांकित शाळांमध्ये प्रवेश देण्यात येत आहे. सीएसआर निधी केवळ महानगर प्रदेशात खर्च न करता समतोल विकासासाठी उपयोग करावा. तसेच या निधीच्या माध्यमातून शिक्षण व आरोग्य क्षेत्रात अधिकाधिक योगदान द्यावे, असे मत फडणवीस यांनी व्यक्त केले.

**जलसंपदा विभागाचा आदेश जारी** | **शेतकऱ्यांसमोर मोठे संकट**

# कुकडीचे आवर्तन सुटले आहे मात्र पाणीपट्टी भरणारांनाच मिळणार कालव्याचे पाणी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर : कुकडी डावा कालव्याचे रब्बी आवर्तन क्रमांक दोन ते १६ फेब्रुवारी रोजी सुरू झाली असून टेल टू हेड या पद्धतीने यावर्तन देण्यात येणार आहे. मात्र ज्या शेतकऱ्यांनी यापूर्वीची पाणीपट्टी पूर्णपणे भरलेली आहे व ज्यांच्याकडे थकबाकी नाही याच शेतकऱ्यांना या आवर्तनामधून पाणी देण्यात येणार आहे. आणि तसा फतवा म्हणजेच आदेश जलसंपदा विभाग पुणे यांच्या कार्यालयाने काढला असून त्याची अंमलबजावणी करण्याबाबत सक्त सूचना पारनेर श्रीगोंदा कर्जत व करमाळा या चारही पाटबंधारे विभागाच्या कार्यालयांना देण्यात आल्या आहे. यामुळे पाणीपट्टी न भरणाऱ्या शेतकऱ्यांना कुकडीचे या आवर्तनाचे पाणी मिळणार की नाही याचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे.

कुकडीचे आवर्तन दरवर्षी किमान तीन वेळा सोडण्यात येते. प्रत्येक



आवर्तनामध्ये शेतकऱ्यांना पाणीपट्टी भरण्याबाबत सूचना जलसंपदा विभागाचे अधिकारी व कर्मचारी करतात मात्र त्या सूचनांकडे नेहमीच दुर्लक्ष करून आवर्तन सुरू झाले की वेगवेगळ्या पद्धतीने पाणी घेण्यावर शेतकऱ्यांचा भर असतो. आवर्तन सुटल्यानंतर पैसे नंतर भरतो असे सांगून अनेक वेळा वेळ मारून नेली जाते. यावेळी मात्र जलसंपदा विभागाने पाणीपट्टी बाबत सक्तीचे धोरण अवलंबिले असल्याचे दिसून येत आहे.


कुकडी डावा कालव्याचे रब्बी आवर्तन क्र.२ सन २०२४- २५ दिनांक १६ फेब्रुवारी २०२५ रोजी सुरू झाले असून कालव्याचे आवर्तन टेल टू हेड पद्धतीने करण्याचे जलसंपदा विभागाचे नियोजन आहे. कोळवडी विभागाचे कार्यक्षेत्रात करमाळा व कर्जत तालुक्यातील शेतकऱ्यांची पाणी मागणी व पाणी उपलब्धतेनुसार पाण्याचे नियोजन केल्याचे जलसंपदा विभागाच्या अभियंत्यांनी सांगितले. मात्र हे करताना ज्या शेतकऱ्यांकडे यापूर्वीची पाणीपट्टी थकबाकी असेल त्यांना पाणी देण्यात येणार नसल्याचे सर्व क्षेत्रीय कार्यालयांना सूचना दिल्या असून, सर्व शेतकऱ्यांना १५ मार्च २०२५ पर्यंत थकीत पाणीपट्टी भरून शासनास सहकार्य करणेबाबत जलसंपदा विभागामार्फत आवाहन करण्यात येत आहे. जर यापूर्वीच्या कालावधीमध्ये शेतकऱ्यांनी पाणीपट्टी भरली नाही तर अशा शेतकऱ्यांना या आवर्तनामधून पाणी देण्यात येणार नाही अशी माहिती जलसंपदा विभागाकडून देण्यात आली आहे.

यामुळे कुकडीचे रब्बीचे हे आवर्तन महावितरण कंपनीने बंद केलेला वीजपुरवठा यामुळे अडचणीत सापडलेल्या असतानाच आता पुन्हा एकदा जलसंपदा विभागाने मागील पाणीपट्टी शेतकऱ्यांनी भरावी तरच या आवर्तनामधून पाणी देऊ अशी भूमिका घेतली असल्यामुळे शेतकऱ्यांसमोर मोठे संकट निर्माण झाले आहे.

# सीबीएसई दहावी बोर्डाची परीक्षा वर्षातून दोनदा होणार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळ अर्थात सीबीएसई आता दहावी बोर्डाच्या परीक्षेबाबत एक महत्वाचा निर्णय घेणार आहे. या संदर्भात सीबीएसईने नवीन धोरण लागू करण्याचा निर्णय घेतला आहे. या नवीन धोरणानुसार १० वीच्या विद्यार्थ्यांची आता वर्षातून दोनवेळा परीक्षा होणार आहे. या संदर्भातील मसुदा केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळाने तयार केला आहे. दरम्यान, वर्षातून दोनवेळा बोर्ड परीक्षा घेण्याचं हे नवीन धोरण २०२६-२७ या शैक्षणिक वर्षापासून लागू करण्यात येणार असल्याची माहिती समोर आली आहे.




केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळ अर्थात सीबीएसईच्या नवीन धोरणानुसार १० वीच्या वर्षातून दोनवेळा परीक्षा घेतली जाईल. त्यातील पहिली बोर्ड परीक्षा १७ फेब्रुवारी ते ६ मार्च या दरम्यान होईल. तसेच दुसरी बोर्ड परीक्षा ही ५ ते २० मे या कालावधीत घेण्यात येईल. मात्र, आता नवीन धोरणानुसार म्हणजे २०२६ पासून पुरवणी परीक्षेचा पर्याय उपलब्ध असणार नाही. आता या नवीन धोरणाचा मसुदा सीबीएसईने तयार केला असून या नवीन मसुद्याला अंतिम मंजुरी देखील दिल्याची माहिती समोर आली आहे. या संदर्भातील वृत्त एनडीटीव्हीने दिलं आहे.

दरम्यान, केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळाने नवीन दहावी बोर्डाच्या परीक्षेबाबत तयार केलेल्या नवीन मसुद्यावर ९ मार्चपर्यंत अभिप्राय देखील घेतले जाणार आहेत. पालकांनी किंवा विद्यार्थ्यांनी त्यावर अभिप्राय दिल्यानंतर या नव्या धोरणाबाबत अंतिम निर्णय घेतला जाईल किंवा शिक्कामोर्तब केलं जाईल. आता यावर नेमकं अभिप्राय काय येतील? हे पाहणं देखील महत्वाचं ठरणार आहे. सीबीएसईच्या या नव्या धोरणाबाबत शिक्षणमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली काही दिवसांपूर्वी बैठक देखील पार पडली होती. या बैठकीत केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळाच्या या नव्या मसुद्याबाबत चर्चा झाली. या बैठकीत वर्षातून दोनदा परीक्षा घेण्याच्या मसुद्यावर एकमत झाल्याचं सांगितलं जातं. दरम्यान, या दोन्ही परीक्षांसाठी विद्यार्थ्यांना एकच केंद्र देण्यात येणार आहे. तसेच विद्यार्थ्यांना या दोन्ही परीक्षांसाठी शुल्क भरावं लागणार आहे. पण दोन्ही वेळा वेगवेगळं शुल्क भरण्याची आवश्यता नसून ते एकदा भरता येणार आहे. तसेच सीबीएसई विद्यार्थ्यांसाठी आता कोणतीही पुरवणी परीक्षा घेणार नाही. या दरम्यान, सीबीएसईच्या परीक्षा वर्षातून दोनवेळा घेतल्या गेल्यानंतर विद्यार्थ्यांचे सर्वोच्च गुण हेच अंतिम निकालासाठी ग्राह्य धरण्यात येणार आहेत.

## संपादकीय....

### वर्षातून दोनदा परीक्षा

केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळ अर्थात सीबीएसई आता दहावी बोर्डाच्या परीक्षेबाबत एक महत्वाचा निर्णय घेणार आहे. या संदर्भात सीबीएसईने नवीन धोरण लागू करण्याचा निर्णय घेतला आहे. या नवीन धोरणानुसार १० वीच्या विद्यार्थ्यांची आता वर्षातून दोनवेळा परीक्षा होणार आहे. या संदर्भातील मसुदा केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळाने तयार केला आहे. दरम्यान, वर्षातून दोनवेळा बोर्ड परीक्षा घेण्याचं हे नवीन धोरण २०२६-२७ या शैक्षणिक वर्षापासून लागू करण्यात येणार असल्याची माहिती समोर आली आहे. केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळ अर्थात सीबीएसईच्या नवीन धोरणानुसार १० वीच्या वर्षातून दोनवेळा परीक्षा घेतली जाईल. त्यातील पहिली बोर्ड परीक्षा १७ फेब्रुवारी ते ६ मार्च या दरम्यान होईल. तसेच दुसरी बोर्ड परीक्षा ही ५ ते २० मे या कालावधीत घेण्यात येईल. मात्र, आता नवीन धोरणानुसार म्हणजे २०२६ पासून पुरवणी परीक्षेचा पर्याय उपलब्ध असणार नाही. आता या नवीन धोरणाचा मसुदा सीबीएसईने तयार केला असून या नवीन मसुद्याला अंतिम मंजुरी देखील दिल्याची माहिती समोर आली आहे. दरम्यान, केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळाने नवीन दहावी बोर्डाच्या परीक्षेबाबत तयार केलेल्या नवीन मसुद्यावर ९ मार्चपर्यंत अभिप्राय देखील घेतले जाणार आहेत. पालकांनी किंवा विद्यार्थ्यांनी त्यावर अभिप्राय दिल्यानंतर या नव्या धोरणाबाबत अंतिम निर्णय घेतला जाईल किंवा शिक्कोमोर्तब केलं जाईल.

# सुरत-चेन्नई ग्रीनफिल्ड कॉरिडोर प्रकल्प : बाधीत भूधारकांची रक्कम एनएचआय स्तरावर प्रलंबित

## उपजिल्हाधिकारी प्रमोद गायकवाड यांनी दिली माहिती

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर (जिमाका) : अहमदनगर- सोलापूर- अक्कलकोट (कर्नाटक हद्द) चौपदरीकरणासाठी भूसंपादन (सुरत - चेन्नई ग्रीनफिल्ड कॉरिडोर प्रकल्प) कामकाजाअंतर्गत अक्कलकोट, बार्शी, दक्षिण सोलापूर व उत्तर सोलापूर तालुक्यातील ५८ गावांतील जमिनी संपादित करण्यात आलेल्या आहेत. महामार्गाकरिता प्राप्त प्रस्तावामधील नुकसानभरपाई मंजूरी आदेश भूमी राशी पोर्टल (एफटीओ) द्वारे प्रकल्प संचालक, भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण यांचेकडे पाठविण्यात आले असून, सदरहू कार्यवाही एनएचआय स्तरावरुन प्रलंबित असल्याची माहिती उपजिल्हाधिकारी (भूसंपादन क्र.११) प्रमोद गायकवाड यांनी दिली.

संपादीत करण्यात आलेल्या तालुका व गावनिहाय प्रलंबित नुकसान भरपाई, वाटपाची माहिती दिनांक २३ जानेवारी ते २० फेब्रुवारी २०२५ या कालावधीतील अक्कलकोट, बार्शी, दक्षिण सोलापूर तालुक्यातील एकूण ८४ नुकसानभरपाई मंजूरी आदेश व ३०८ खातेदारांची नुकसानभरपाई रक्कम रु. १५.९२ कोटी भूधारकांच्या खातेमध्ये जमा करण्यासाठी राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण सोलापूर यांचे कार्यालयाकडे पाठविण्यात आले आहेत. या प्रकरणांमधील पुढील कार्यवाही करणेची जबाबदारी भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण विभागाची असून प्राधिकरणामार्फत सदरची रक्कम बाधीत भूधारकांच्या खातेवर जमा करण्यात आलेली नाही.

तसेच अहमदनगर- सोलापूर- अक्कलकोट (कर्नाटक हद्द) चौपदरीकरणासाठी भूसंपादन (सुरत - चेन्नई ग्रीनफिल्ड कॉरिडोर प्रकल्प) कामकाजाअंतर्गत सन २०२३ ते २०२५ या कालावाधीमध्ये एकूण ३३ मूळ व पुरवणी निवाडे जाहीर करण्यात आले असून निधी मंजूरीकरिता राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण सोलापूर यांचे कार्यालयाकडे पाठविण्यात आले आहेत.सक्षम प्राधिकारी कार्यालयाकडून घोषीत करण्यात आलेल्या ३३ निवाडयांमधील एकूण संपादित क्षेत्र २०६.६४ हे. आर करीता निवाड्याची रककम रुपये ४९१.५३ कोटी अनुदान उपलब्ध होऊन मिळणेबाबत प्रकल्प संचालक, भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण सोलापूर व महाव्यवस्थापक (तां), राष्ट्रीय महामार्ग प्रादेशिक कार्यालय, मुंबई या कार्यालयाकडे पाठपुरावा करण्यात आलेला आहे. प्रस्तावित महामार्गाकरिता जाहीर करण्यात आलेल्या निवाडयांमध्ये निधी उपलब्ध करुन देण्याची जबाबदारी भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण विभागाची असल्याचेही उपजिल्हाधिकारी (भूसंपादन क्र.११) प्रमोद गायकवाड यांनी कळविले आहे.

## नागणसुर कन्नड मुली-मुले शाळेत फन-फेअर उत्साहात

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट/प्रतिनीधी



अक्कलकोट तालुक्यातील नागणसुर येथील जिल्हा परिषद प्राथमिक कन्नड मुली व मुले शाळेत आयोजित फन-फेअर २०२५ मोठ्या उत्साहात पार पडले.

लहानपणापासून विद्यार्थ्यांचा अंगी स्वावलंबन आणि स्वतःचा पायावर उभे राहण्यासाठी तसेच व्यावहारिक दृष्टीकोन वाढीसाठी पुढील जीवनात उद्योजक होण्यासाठी फन - फेअर २०२५ आयोजित केले होते.कार्यक्रमाचे दिव्य सानिध्य डॉ.अभिनव बसवलिंग महास्वामिजी होते.कार्यक्रमाचे अध्यक्ष स्थानी ग्रामपंचायत सदस्य ओंकार गंगोंडा होते.प्रारंभी ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले प्रतिमेचे पूजन शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष गंगाधर भोसगी,बसनिंगय्या स्थावरमठ यांच्या हस्ते करण्यात आले.व्यासपीठावर तालुका शिक्षक संघाचे अध्यक्ष बसवराज खिलारी ,केंद्रीय मुख्याध्यापक विद्याधर गुरव , श्रीशैल दोडमनी,शाळा व्यवस्थापन समितीचे उपाध्यक्ष बसवराज तेग्गीनकेरी, गजानंद रेवी,प्राचार्य शंकर व्हनमाने,बसवराज धनशेट्टी बाळकृष्ण म्हेत्रे,भीमाशंकर चौगुले,मलकप्पा हिप्परगी,बसवराज दोडमनी, श्रीशैल फुलारी,आदी उपस्थित होते.सर्व मान्यवरांचे हस्ते नुकतेच मुंबई पोलीस म्हणून नियुक्त झालेले नागणसुर गावचे ऐश्वर्या क्यातनकेरी, काजल गंगोंडा,नागेश नागलगांव,चंद्रकांत माशाळकर यांना गुलाब पुष्पवृष्टी करत सत्कार करून पुढील कार्यासाठी शुभेच्छा देण्यात आले.

त्यानंतर कन्नड मुली शाळेतील विद्यार्थिनींनी एकूण ३५ स्टॉल व मुले शाळेतील विद्यार्थी १० स्टॉल उभारण्यात आले होते. त्यामध्ये भेळ ,पावभाजी, मस्कापाव, व्हेज पॅटीस, मसालाडोसा, बासुंदी, बदाम शेक, पेढा, रसना, पाणीपुरी, दहीपुरी, मिसळपाव, इडली, कांदाभजी, मिरची भजी, गुलाब जामुन, ढोकळा, संगम वडा, सँडविच, फिंगर चिप्स, मसाला दूध, मठ्ठा, सोनपापडी, पापड, चहा, दाल राईस, आइस्क्रीम, कुल्फी, समोसा, कॉफी तसेच मनोरंजन खेळ असे विविध स्टॉल उभारून प्रत्येक स्टॉलधारक ५०० ते २००० रुपये पर्यंत विक्री करून एका दिवसाचे कमाई त्यांचा आईवडिलांच्या हाती दिले आहे. प्रत्येक स्टॉल धारक विद्यार्थ्याला २०० ते १००० रुपये लाभ झाले आहे . नागणसुर महसूल गावातील एच.जी.प्रचंडे प्रशाला,शेळके प्रशाला,जिल्हा परिषद मराठी शाळा,लिंबितोट वस्ती,बंधूनगर वस्ती, नागलगांव वस्ती,इंदिरानगर वस्ती कन्नड मराठी,उर्दू शाळेतील सर्व शिक्षक,विद्यार्थी फन फेअर ला भेट देऊन प्रत्येक स्टॉल ला भेट देत खाद्यपदार्थ खरेदी करून खाऊन एन्जॉय केले.दुपारी २.०० वाजेपर्यंत शाळेच्या आवारात पालक,ग्रामस्थ गर्दी केले होते. विद्यार्थ्यांचे व्यावहारिक दृष्टीकोन पाहून आनंद व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्र संचालन शरणप्पा फुलारी यांनी केले तर आभार राजकुमार नरूणे यांनी मानले.कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी विषय शिक्षक शरणप्पा फुलारी,राजशेखर खानापुरे,राजकुमार नरूणे,राजशेखर कूर्ले, शांताबाई तोळणूरे,बसय्या स्वामी,गुरूबाई प्रचंडे खाजप्पा किणगी समवेत विद्यार्थी पालक परिश्रम घेतले.

नागणसुर कन्नड मुली - मुले शाळेत फन-फेअर प्रसंगी नुकतेच मुंबई पोलीस क्षेत्रात निवड झालेल्या काजल गंगोंडा,ऐश्वर्या क्यातनकेरी,नागेश नागलगांव,चंद्रकांत माशाळकर यांच्या सत्कार करताना डॉ.अभिनव बसवलिंग महास्वामिजी, गंगाधर भोसगी, श्रीशैल दोडमनी, गुरूबाई प्रचंडे, ओंकार गंगोंडा, बसवराज तेग्गीनकेरी, बसवराज खीलारी, बसवराज स्वामी आदी उपस्थित होते.

## दिंडेगाव येथील सद्गुरू शिवराम बुवा महाराज यात्रेस महाशिवरात्रीस प्रारंभ

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

तुळजापूर/प्रतिनिधी : तुळजापूर तालुक्यातील मौजे दिंडेगाव येथील ग्रामदैवत श्री सद्गुरू शिवराम बुवा महाराज यात्रेस बुधवार दि.२६ फेब्रुवारी महाशिवरात्री रोजी प्रारंभ होत असून शुक्रवार दि.२८ फेब्रुवारी रोजी दुपारी काल्याचे किर्तन व महाप्रसादाचे वाटप होणार आहे. प्रतिवर्षा प्रमाणे याही वर्षी श्री संत सद्गुरू शिवराम बुवा महाराज यांची यात्रा मोठ्या उत्साहात संपन्न करण्यात येणार असून तीन दिवस ही यात्रा संपन्न होणार आहे.

या सद्गुरू शिवराम बुवा महाराज यात्रेस तुळजापुर, उमरगा, कळंब, भुम, अक्कलकोट, सोलापूर, धाराशिव, मोहोळ, लोहारा, औसा, निलंगा, लातूर आदि भागातून बहुसंख्य वारकरी भाविक भक्त या यात्रेस उपस्थित राहतात.

त्यामुळे श्री संत सद्गुरू शिवराम बुवा महाराज यांची यात्रा ही ग्रामीण भागात खूप मोठ्या प्रमाणात भरते. यात्रेकरू भाविकांना पिण्याच्या पाण्याची सोय व्हावी यासाठी मंदिर कमिटी व ग्रामपंचायतच्या वतीने पिण्याच्या पाण्याची सोय करण्यात आलेली आहे. परिसरातील जवळपास ४० ते ५० दिंड्या उपस्थित राहतात टाळ मृदंग व राम कृष्ण हरी च्या जय घोषात वारकरी तल्लीन होतात.

ग्रामीण भागातील ही यात्रा म्हणजे प्रति पंढरपूर समजले जाते तरी भाविकांनी या यात्रेतील धार्मिक कार्यक्रमाचा लाभ घ्यावा असे आवाहन यात्रा कमिटीच्या वतीने करण्यात आलेले आहे.



## निफाड इंग्लिश स्कूलमध्ये भरली माजी विद्यार्थ्यांची शाळा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी




निफाड इंग्लिश स्कूल विद्यालयात माजी विद्यार्थ्यांचे गेट-टुगेदर उत्साहात निफाड येथील निफाड इंग्लिश स्कूल विद्यालय इत्या दहावी सन २०१० च्या बॅचच्या माजी विद्यार्थी विद्यार्थिनी पुन्हा एकत्र येऊन जुन्या आठवणींना उजाळा दिलाअसून तब्बल पंधरा वर्षानंतर माजी विद्यार्थ्यांचा गेट-टुगेदर पार पडला, कार्यक्रमाची सुरुवात राष्ट्रगीत गाऊन व कवायत करून झाला.

यावेळी जुन्या आठवणींना उजाळा देताना अनेकांना गहिवरून आले होते,

१५ वर्षपूर्वी शाळेत असताना अगदी लहान असणाऱ्या मुलांनी आज आपल्या क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करून आपली ओळख निर्माण केल्याचे पाहून शिक्षकांना देखील विद्यार्थ्यांचा अभिमान वाटला.

यावेळी अनेक विद्यार्थ्यांनी आपल्या अनेक आठवणी सर्वांसमोर व्यक्त केल्या, या स्नेह मेळाव्याला शिक्षक राजेंद्र सोमवंशी, अविनाश गांगोडे, राजेंद्र गांगोडे, तुषार कराड, पुंड सर, कोळी सर, मासरे सर ,टी बी आहेर उपस्थित होते.

या दरम्यान माजी विद्यार्थ्यांनी आपले मनोगत व्यक्त केले, तसेच माजी विद्यार्थ्यांतर्फे सर्व शिक्षकांना शाल व श्रीफळ देऊन सत्कार केला, नेहमीप्रमाणे सोमवंशी सरांनी कविता वाचून परत एकदा सर्व माजी विद्यार्थ्यांना मंत्रमुग्ध केले व नंतर भोजनाचा आस्वाद घेतला.

या स्नेह मेळाव्यासाठी माजी विद्यार्थी व विद्यार्थिनी कल्याणी वडघुले, विजय केदार, सौरभ वडघुले, भरत निकम, सोमनाथ ताडगे, अमित वडघुले, विकी खडताळे, राजेंद्र निकाळजे, गौरव कर्डीले, तुषार गवारे, अश्विनी गाजरे, सोनाली सांगळे, ज्योती शिंदे, गायत्री भवर, कुणाल साळवे, वैभव संगमनेर, इ.विद्यार्थी उपस्थीत होते.

# निफाड उपजिल्हा रुग्णालयात बिनटाक्याचे कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया शिबिर

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड /प्रतिनिधी

जिल्हा रुग्णालय नाशिक उंचव जिल्हा परिषद, आरोग्य विभाग, नाशिक यांच्या संयुक्त विद्यमाने तसेच जिल्हा रुग्णालय नाशिक येथे कार्यरत जिल्हा शल्यचिकित्सक डॉ चारुदत्त शिंदे व जिल्हा आरोग्य अधिकारी, नाशिक येथील कार्यरत डॉ सुधाकर मोरे यांच्या मार्गदर्शनाखाली बिन टाक्याचे कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया शिबिराचे आयोजन करण्यात आले.

**बिन टाक्याचे कुटुंब नियोजन शस्त्रक्रियेत महिलांना कमी त्रासदायक आणि वेदना रहित प्रक्रिया असते या शस्त्रक्रियेत कोणतेही मोठे काप किंवा टाके घेतले जात नाहीत रक्तस्त्राव खूप कमी होतो बिन टाक्याच्या शस्त्रक्रियेमुळे रुग्ण काही तासात घरी जाऊ शकतो त्यानंतर रुग्ण आपल्या दैनंदिनी कामकाजाकरिता जलद पडू शकतो गर्भधारणा टाळण्यातही शस्त्रक्रिया अतिशय प्रभावी आहे**

**– डॉ. राजीव तांभाळे (वैद्यकीय अधीक्षक उपजिल्हा रुग्णालय निफाड)**

महाराष्ट्रातील प्रसिद्ध कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया करणारे डॉ वसंत जमदाडे यांचे डॉ राजीव तांभाळे, वैद्यकीय अधिक्षक यांच्या हस्ते स्वागत करण्यात आले. सदरील शिबिरात एकूण ५२ महिलांचे बिन टाक्याचे कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया करण्यांत आली,. यावेळी

तालुका आरोग्य अधिकारी डॉ सुजित कोशिरे यांनी सदरील शिबिराबाबत माहिती दिली की ,एकदाच केलेली शस्त्रक्रिया आजीवन प्रभावी राहते.

महिलांना वारंवार गोळ्या किंवा इतर गर्भनिरोधक वापरण्याची गरज भासत नाही.

ही प्रक्रिया तुलनेने स्वस्त आहे आणि आरोग्य केंद्रांमध्ये सहज उपलब्ध आहे.




सर्व शासकीय रुग्णालयांमध्ये मोफत केली जाते. कुटुंब नियोजनामुळे आर्थिक आणि सामाजिक प्रगतीस चालना मिळते. स्त्रियांच्या आरोग्याचे संरक्षण होते आणि मातृमृत्यू दर कमी होतो. याकरिता अश्या सर्व शिबिरात आपले बिन टाक्याचे कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया करून घेण्याबाबत यावेळी अहवान केले

उपजिल्हा रुग्णालय निफाड येथील कार्यरत डॉ लाड, डॉ गावले , डॉ . प्रल्हाद चव्हाण, डॉ आथरे, डॉ रामेश्वर गोराडे, मेट्रन, दाभाडे ,अधिपरिचारिका, पाटील, निरभवने, निळे, कंटाळे, प्रयोगशाळा वैज्ञनिक अधिकारी पौर्णिमा कोंडके, प्रयोगशाळा सहायक साळुंके, शिपाई, अरुण गोसावी, सुनील राठोड व इतर अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते . तसेच पंचायत समिती आरोग्य विभाग, निफाड अंतर्गत कार्यरत डॉ सुजित कोशिरे तालुका आरोग्य अधिकारी, डॉ जाधव निमगाव वा, डॉ कलिम पठाण, डॉ रुपाली आहेर उक्ज, सारजळ, श्रीम शिरसाठ विस्तार अधिकारी, मन्सूरी, राजेंद्र सानप,आरोग्य सहाय्यक, समिर मुरडेश्वर, दिलिप बोदडे, थोरे, श्री भांड चझथ यांचे शिबिराकरिता मोलाचे योग्यदान दिले.

## निर्यातक्षम आंबा बागेची मँगोनेट प्रणालीव्दारे नोंदणी करण्याचे आवाहन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर (जिमाका) : युरोपियन युनियन व इतर देशांना आंबा निर्यातीसाठी अपेडाच्या मँगोनेट प्रणालीद्वारे निर्यातक्षम आंबा बागांची नोंदणी केली जाते. सन २०२४-२५ मध्ये आज अखेर महाराष्ट्र ९ हजार ४५९ तर सोलापूर जिल्ह्यातून ५३९ निर्यातक्षम आंबा बागांची नोंदणी झालेली आहे. निर्यातक्षम आंबा बागाची मॅगोनेट या ऑनलाईन प्रणालीवर नोंदणी करण्याची अंतिम दिनांक ३१ डिसेंबर, २०२५ होती. परंतु अपेडा नवी दिल्ली कार्यालयाकडे विनंती करून ही मुदत दि.२८ फेब्रुवारी २०२५ पर्यंत वाढविण्यास आली आहे. त्यामुळे उर्वरित कालावधीत विशेष मोहीम राबवून निर्यातक्षम आंबा बागांची नोंदणी कृषी विभागामार्फत करण्यात येत आहे.

निर्यातक्षम आंबा फळबागेत राबवायच्या योग्य कृषी पध्दती राबविणे आवश्यक आहे. युरोपीय युनियन व अमेरिका देशाला आंबा निर्यात करण्यासाठी क्षेत्रीय / शेतकरी स्तरावर ठेवायचे दस्तऐवजचे विहित प्रपत्रात जतन करण्यात यावे. याबाबतच्या सूचना आयुक्तालयाचे दि. ६ जून २०२४ व दि. १४ फेब्रुवारी २०२५ रोजीच्या पत्राने देण्यात आल्या आहेत. निर्यातक्षम आंबा बागांची नोंदणी करण्यासाठी शेतकऱ्यांनी विहित नमुन्यात (प्रपत्र १) अर्ज दाखल करावा. त्यानंतर तपासणी अधिकाऱ्यांमार्फत क्षेत्राची तपासणी करून प्रपत्र ४ अ मध्ये अहवाल जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी यांना सादर केला जातो. त्यानंतर २ व प्रपत्रात नोंदणी प्रमाण पत्र अदा केले जाते. शेतकऱ्यांनी पिक संरक्षणाच्या दृष्टीने शेतात राबविण्यात येणाऱ्या महत्वाच्या बाबींच्या नोंदी प्रपत्र क मध्ये नोंदी वेळेत घेणे आवश्यक आहे.

जिल्ह्यातील आंबा बागायतदारांनी सन २०२४-२५ मध्ये चालू हंगामाकरिता नोंदणी करण्यासाठी संबंधित कृषि सहाय्यक, कृषि पर्यवेक्षक, कृषि अधिकारी च तालुका कृषि अधिकारी कार्यालय यांचेशी संपर्क साधून मॅगोनेटद्वारे नोंदणीसाठी त्वरीत अर्ज करण्यात यावेत. प्रथम नोंदणी व नूतनीकरण करणेसाठी विहीत नमुन्यातील अर्ज, ७/१२, ८अ, बागेचा नकाशा व आधार कार्ड इत्यादि कागदपत्राची आवश्यकता आहे.

मॅगोनेटद्वारे नोंदणी करण्याची वाढीव व अंतिम मुदत दि. २८ फेब्रुवारी २०२५ अशी आहे. निर्यातक्षम आंबा बागांची वेळेत नोंदणी करणे करीता संबंधित जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांचे कार्यालयाशी संपर्क साधून विहीत मुदतीत नोंदणी करण्याचे आवाहन जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी शुक्राचार्य भोसले यांनी केले आहे.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय :** सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय :** प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

## थोडक्यात...

### हात उसने घेतलेल्या पैशावरून मारहाण ; चौघांवर गुन्हा

सोलापूर : हात उसने घेतलेल्या पैशांवरून लोखंडी रॉड काढून डोक्यात मारून मारहाण केल्याची घटना १९ फ ेब्रुवारी रोजी रात्री पावणे बारा वाजण्याच्या सुमारास विद्यापीठ समोर घडली.याप्रकरणी सचिन अर्जुन शिरसट (वय-३२,म ुपो.भोगाव,तालुका उत्तर सोलापूर) यांनी फौजदार चावडी पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे.त्यांच्या फिर्यादीवरून अश्विनी कांबळे,राहुल शिंदे व दोन अज्ञात इसम यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. याबाबत अधिक माहिती अशी की,फिर्यादी व फिर्यादी यांचे मित्र जयपाल असे रिक्षातून सोलापूरकडे जात असताना रिक्षा क्रमांक एमएच.१३.जी.९३१० ही रस्त्याच्या कडेला लघवीसाठी उभी केली असता,त्यावेळी वरील संशयित आरोपी हे रिक्षा जवळ आले व त्यातील अश्विनी कांबळे यांच्याकडून हात उसने घेतलेले तीन हजार पाचशे रुपये दे असे म्हणाले असता,त्यांनी फिर्यादी यांना तुला पैसे देणार नाही.असे म्हणून शिवीगाळ केली. तसेच इतर संशयित आरोपी यांनी फिर्यादीस मारहाण करत डोक्यात रॉड घालून जखमी केल्याचे फिर्यादीत नमूद आहे.पुढील तपास पोलीस हेडकॉन्स्टेबल घुगे हे करीत आहेत.

### विवाहितेचा छळ ; पतीसह चौघांविरुद्ध गुन्हा

सोलापूर (प्रतिनिधी) तुझ्या वडिलांनी लग्नात सोने घातले नाही व फर्निचर दिले नाही म्हणून मानसिक व शारीरिक त्रास देऊन विवाहितेचा छळ केल्याची घटना १७ जानेवारी २०१६ ते २६ जानेव-ारी २०२३ दरम्यान सासरी नाशिक येथे घडली.याप्रकरणी कीर्ती भालचंद्र दाभाडे (वय-४४, रा. उमेदपूर कॉलनी सेटलमेंट फ्री कॉलनी) यांनी सलगर वस्ती पोलीस ठाण्यात फिर्यादी दिली.त्यांच्या फिर्यादीवरून पती भालचंद्र दाभाडे (रा.नाशिक) ननंद तनुजा बाभुळगावकर, नंदवा जितेंद्र बाबुळगावकर, माधव दाभाडे (रा.रंगराज गल्ली,सराफ मार्केट,नांदेड) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.

# अवैध वाळू वाहतूकीवर महसूल व पोलिस प्रशासनाची कारवाई

## तहसिलदार सचिन लंगुटे यांची माहिती; १८ लाकडी होड्या केल्या नष्ट










**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : अवैध वाळू उपसा व वाहतूकी विरोधात पंढरपूरच्या महसूल विभागाने धडक मोहीम हाती घेतली आहे. महसूल व पोलीस प्रशासनाच्या पथकाने भीमा नदीपात्रात अवैध वाळू वाहतूकीसाठी वापरण्यात येणाऱ्या १८ लाकडी होड्या जेसीबी व कटरच्या साह्याने पूर्णपणे नष्ट करण्यात आल्याची माहिती तहसिलदार सचिन लंगुटे यांनी दिली.

पंढरपूर तालुक्यातील अवैध वाळू उपसा रोखण्यासह वाळूची अवैध वाहतूक करणाऱ्यांच्या विरोधात कारवाई करण्यासाठी प्रांताधिकारी सचिन इथापे यांच्या मार्गदर्शनाखाली तहसिलदार सचिन लंगुटे यांनी विविध पथकांची नेमणूक केली आहे. दिनांक २४ फेब्रुवारी २०२५ रोजी पंढरपूर शहरा नजीकच्या चंद्रभागा नदी पात्रामध्ये पंढरपूर - इसबावी दरम्यान असणाऱ्या ओढ्यामधील अवैध वाळू वाहतुकीसाठी वापरण्यात येणाऱ्या ८ लाकडी होड्या जेसीबीच्या सहाय्याने नष्ट करण्यात आल्या. तसेच शिरढोण - इसबावी दरम्यान असणाऱ्या ओढ्यामधील अवैध वाळू वाहतुकीसाठी वापरण्यात येणाऱ्या १० लाकडी होड्या कट्टर च्या साह्याने कट करून पूर्णपणे नष्ट करण्यात आल्या. या कारवाईमध्ये मंडळ अधिकारी विजय शिवशरण, राजेंद्र वाघमारे, रिगन चव्हाण.ग्राम महसूल अधिकारी अमर पाटील,प्रमोद खंडागळे , महेश-कुमार सावंत, गणेश पिसे, संजय खंडागळे रविकिरण लोखंडे , पि पि कोईगडे ,पीयूष भोसले, दिगंबर डोईफोडे व पंढरपूर शहर पोलीस स्टेशनचे अधिकारी व कर्मचारी सहभागी होते.

## डोहोळे गावातील विहिरीचे पुनर्जीवन; माझी वसुंधरा अभियानांतर्गत डोहोळे ग्रामपंचायतीचा पुढाकार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

ठाणे प्रतिनिधी/मिलिंद जाधव : दिवसेंदिवस पाण्याची भीषण टंचाई निर्माण होत असताना पाण्याचे स्रोत शोधता शोधता महिला व पुरुषांची दमछाक होत आहे. पाण्याची भीषण टंचाई असून, गावातील एक विहीर गाळाने भरलेली होती. म्हणून भिवंडी तालुक्यातील डोहोळे ग्रामपंचायती हद्दीतील माझी वसुंधरा अभियानांतर्गत डोहोळे गावातील विहिरीचे पूर्णजीवन करण्यात आले.

ग्रामीण भागातील नागरिकांना पाणी उपलब्ध व्हावे, म्हणून याचे गांभीर्य लक्षात घेता ,विहिरीतील गाळ काढला असून विहिरीत पाणी पाहून नागरिकांच्या चेहर्यावरील आनंद द्विगुणित झाला. यावेळी डोहोळे ग्रामपंचायत अधिकारी परेश सोनावणे यांनी विहिरीची पाहणी केली. व पाणी वाचवा असा संदेश गावातील नागरिकांना दिला.



## सोलापूरचे पालकमंत्री तथा ग्रामविकास मंत्री श्री जयकुमार गोरे यांना पितृशोक

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



पंढरपूर/प्रतिनिधी : ग्राम विकास मंत्री तथा सोलापूरचे पालकमंत्री जयकुमार गोरे यांचे वडील भगवानराव रामचंद्र गोरे यांचे दिनांक २५ फेब्रुवारी रोजी पहाटे दीर्घ आजारांनी दुःखद निधन झाले आहे मागील काही दिवसापासून त्यांची प्रकृती अस्वस्थता होती त्यांच्यावर पुण्यातील खाजगी रुग्णालयात उपचार सुरू होते.उपचार दरम्यान दिनांक २५ फेब्रुवारी रोजी पहाटेच्या सुमारास त्यांची प्राणज्योत मावळली.

त्यांच्या पश्चात त्यांची सुपुत्र अंकुश, जयकुमार , शेखर, व सौ सुरेखा, सुनाना धोंडे असा मोठा परिवार आहे.

गोरे यांच्या मूळ गावी सात-ारा जिल्ह्याच्या माण तालुक्यातील बोराटेवाडी येथील निवासस्थानी सकाळी ११ ते ४ वाजेपर्यंत त्यांचे पार्थिव अंत दर्शनासाठी ठेवण्यात येणार असून दुपारी चार वाजता राहत्या घरापासून अंत्ययात्रा निघणार आहे येथील श्री वैकुंठ स्मशानभूमी त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत.

## श्री विठ्ठल रूक्मिणीमातेच्या चरणी तीन किलोच्या चांदीच्या वस्तू अर्पण



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर /प्रतिनिधी : श्री विठ्ठल रूक्मिणी मंदिरे समितीस खेड (जि.पुणे) येथील पांडूरंग कड व भरत कड या भाविकांनी सुमारे ३ किलो वजनाच्या चांदीच्या वस्तू अर्पण केल्याची माहिती मंदिर समितीचे व्यवस्थापक मनोज श्रोत्री यांनी दिली.

त्याबद्दल देणगीदार भाविकाचा मंदिर समितीच्या वतीने मंदिर समितीचे पुजारी तथा सहायक विभाग प्रमुख संदीप कुलकर्णी यांच्या हस्ते श्री विठ्ठल रूक्मिणी मातेची प्रतिमा व उपरणे देऊन यथोचित सन्मान करण्यात आला. त्यावेळी देणगीदार यांचे कुटुंब व मंदिर समितीचे कर्मचारी उपस्थित होते.

सदरची देणगी पांडूरंग व भरत कड या बंधूंनी आ-पले पितार्थी कै. कृष्णाजी सोपानराव कड यांच्या स्मरणार्थ दिली असून, त्यामध्ये चांदीचे ४ नग ताम्हण, ४ पेले व ४ पळी इत्यादीचा समावेश असून, त्यांचे अंदाजे वजन ३ किलो होत आहे. कड बंधू हे श्री विठ्ठल रूक्मिणी मातेचे निस्सिम भक्त आहेत व



ते कुरूळी तालुका खेड (जि.पुणे) येथील रहिवाशी आहेत. या चांदी वस्तूचा श्रींच्या तुळशी पूजेसाठी उपयोग होणार असल्याचे यावेळी श्री श्रोत्री यांनी सांगितले.

## बोळेगाव तलाठी सज्ञाचे नुतन तलाठी शिवकन्या शिंदे रुजू : ग्रामस्थानी केला सत्कार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

वागदरी ( एस. के. गायकवाड) : तुळजापूर तालुक्यातील गाव कामगार तलाठी सज्जा बोळेगाव चे नुतन तलाठी शिवकन्या शिंदे यानी आपला परभार स्विकारला.

पदभार घेताच येथील ग्रामस्थ-ानी गावच्या पोलीस पाटील अश्विनी सुर्यवंशी यांच्या हस्ते त्यांचा सत्कार करून स्वागत केले.

येथील गाव कामगार तलाठी सज्जावर कार्यरत असलेले तलाठी अमर पडवळ यांची अन्यत्र बदली झालाने त्यांच्य जागी शिवकन्या शिंदे यांची शासनाने तलाठी म्हणून नियूक्ती केल्याने ते नुकतल आपला पदभार स्विकारुन कामावर रूजू झाल्याने येथील ग्रामस्थानी त्यांचा पोलीस पाटील अश्विनी सुर्यवंशी यांच्या हस्ते यथोचित सत्कार करून स्वागत केले तर येथे कार्यरत असलेले तलाठी अमर पडवळ यांची बदली झाल्याने ग्राम स्थांच्या वतीने गावचे सरपंच विलास पाटील यांच्या हस्ते सत्कार करून त्याना निरोप देण्यात आला.

यावेळी उपसरपंच शांताबाई मुलगे, ग्रा.प.सदस्य अंगद जाधव, सामाजिक



कार्यकर्त्या संगीता सुरवसे,चैतन रुपनुर,सोपान सुरवसे,पंडीत सुरवसे, संजय सुरवसे सह ग्राम स्थ उपस्थित होते.

## रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया एकतावादी अक्कलकोट तालुका शहर कार्यकारणी निवड

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट/प्रतिनीधी

रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया एकतावादी अक्कलकोट तालुका शहर कार्यकारणी निवड करण्यात आली.

लिंबाजी कलकुटगी तालुका शेतकरी संघटना सागर बरबडे दहिटणे विभाग शेतकरी संघटना दाजी चव्हाण शेतकरी संघटना तालुका सचिव नामदेव गरडे कामगार आघाडी दहिटणे विभाग मजनू कोंडीबा नदाफ कलाकार संघटना दहिटणे विभाग दिगंबर सालपे वाहक चालक संघटना तालुकाध्यक्ष बलभीम मधुरकर कामगार सेल तालुका सचिव एवढ्या पदाधिकाऱ्यांची आज रोजी रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया इत्यादी रोजगार आघाडी प्रदेशाध्यक्ष विकीबाबा चौधरी यांच्या अध्यक्षतेखाली निवड करण्यात आली.



पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष नानास-ाहेब इंदिसे युवा अध्यक्ष भैय्यासाहेब इंदिसे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष विलास निकम व यांच्या आदेशाने सोलापूर जिल्हा महाराष्ट्र मध्ये रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया एकतावादीच काम प्रामाणिक व निष्ठा ध्येय धोरण ठेवून आज रोजी पक्षाच्या सर्व कार्यकर्त्यांची निवड करण्यात आली.

प्रमुख उपस्थिती विकीबाबा चौधरी रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया एकतावादी रोजगार आघाडी राम चव्हाण शंकर चव्हाण दिनेश रसनभैरे तम्मा चौधरी शंकर चव्हाण ताजुद्दीन शेख सोमना बनसोडे अन्य कार्यकर्ते होते.

### कार्यशाळेत सोलापूर जिल्ह्यातील १५ शाळांचे २९ शिक्षक व ३४ विद्यार्थ्यांनी सहभाग

### डॉ. सुहासिनी शहा यांचे प्रतिपादन

# सुसंस्कृत नागरिक घडविण्यासाठी लैंगिकता शिक्षण आवश्यक

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर/प्रतिनिधी : अलीकडे समाज माध्यमांद्वारे लैंगिक शिक्षणाबद्दल चुकीची माहिती मिळते. त्यामुळे किशोरवयीन व तरुण मुले - मुली अनेक गैरसमजाला बळी पडत आहे. त्यामुळे समाजात अत्याचार, लैंगिक शोषण, बलात्काराचे प्रकार वाढत आहेत. त्यासाठी शास्त्रशुद्ध पद्धतीने लैंगिकता शिक्षण शाळा - महाविद्यालयातून देणे ही काळाची गरज झालेली आहे. त्यातूनच सुसंस्कृत नागरिक घडू शकतील अशी आशा प्रिसिजन फाउंडेशनच्या अध्यक्षा डॉ. सुहासिनी शहा यांनी व्यक्त केली.

त्या प्रिसिजन फाउंडेशन सोलापूर, फॅमिली प्लॅनिंग असोसिएशन ऑफ इंडिया सोलापूर शाखा व इंडियन रेडक्रॉस सोसायटी, शाखा सोलापूर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित पियर एज्युकेटर, कम्युनिटी मोबिलायझर ट्रेनिंग कार्यक्रमात बोलत होत्या. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी फॅमिली प्लॅनिंग असोसिएशन ऑफ इंडिया सोलापूर शाखेचे मार्गदर्शक प्रा. डॉ. श्रीकांत येळेगावकर हे होते.

या यावेळी व्यासपीठावर फॅमिली प्लॅनिंग सोलापूर शाखेचे चेअरपर्सन प्रा. डॉ. एन. बी. तेली, इंडियन रेडक्रॉस सोसायटी शाखा सोलापूरचे चेअरमन डॉ. राजीव प्रधान, ल. गो. काकडे एज्युकेशनल फाउंडेशनच्या विश्वस्त




डॉ. नभा काकडे, प्रिसिजन फाउंडेशन जनसंपर्क विभागाचे व्यवस्थापक माधव देशपांडे, फॅमिली प्लॅनिंग सोलापूर शाखेचे शाखाधिकारी सुगतरत्न गायकवाड आदी उपस्थित होते.

सर्वंकष लैंगिकता शिक्षण कार्यक्रम घेण्यात आलेल्या शाळेतल्या विद्यार्थ्यांनी व प्रशिक्षक अश्विन कडलास यांनी शिवजयंती निमित्त दांडपट्टा चालविण्याचा जागतिक कीर्तिमान केला त्याबद्दल डॉ. सुहासिनी शहा यांच्या हस्ते त्यांचा विशेष सत्कार करण्यात आला.

यावेळी अश्विन कडलास यांनी उपलब्ध साधनातून स्व - संरक्षण याविषयी प्रात्यक्षिकांतून मार्गदर्शन केले.

कार्यक्रम अधिकारी वीरेंद्र परदेशी यांनी पियर एज्युकेटरची भूमिका याविषयी, निर्माण बहुउद्दे-शीय विकास संस्थेच्या प्रकल्प अधिकारी नम्रता खरात नरोटे यांनी पॉक्सो क्ट, लिंगभेद आधारित हिं-साचार व जीवन कौशल्य याविषयावर तर सुगतरत्न गायकवाड यांनी सकस आहार एच.आय.व्ही./एड्स व कॅन्सर याविषयी मार्गदर्शन केले.

शेवटी मान्यवरांच्या हस्ते उप-स्थित शिक्षक व विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र वाटप करण्यात आले. या कार्यशाळेत सोलापूर जिल्ह्यातील १५ शाळांचे २९ शिक्षक व ३४ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला.

कार्यक्रमाचे स्वागत प्रा. डॉ. एन. बी. तेली यांनी केले. प्रास्ताविक सुगतरत्न गायकवाड यांनी केले. सूत्रसंचालन वीरेंद्र परदेशीं यांनी केले तर आभार कांचन हुन्नुरे यांनी मानले.

# इंदापूर तालुक्यातील अवैध धंदे व कार्यकर्त्यांवरती खोट्या गुन्ह्यासंदर्भात डीवायएसपी व एसपी यांच्याशी बोलणार : केंद्रीय मंत्री रामदास आठवले

## मा.सभापती राम शिंदे यांनी पाठवले विशेष पोलीस निरीक्षक कोल्हापूर यांना पत्र; पोलिस निरीक्षक सुर्यकांत कोकणे यांच्या अडचणीत वाढ

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

इंदापूर प्रतिनिधी/अतुल सोनकांबळे

इंदापूर पोलीस स्टेशनच्या हद्दीत चालणाऱ्या अवैद्य धंदयांना पाठीशी घालुन लाखो रुपयांची काळी माया गोळा करणारे, मुजोर, जातीयवादी, हप्ताखोर पोलीस निरीक्षक श्री. सुर्यकांत कोकणे यांची खातेनिहाय चौकशी करुन त्यांना तात्काळ निलंबीत करुन, पोलीस निरीक्षक सुर्यकांत कोकणे यांच्या स्थावर व जंगम नामी, बेनामी मालमत्तेची चौकशी व्हावी, मागासवर्गीय सामाजिक कार्यकर्त्यांना संरक्षण द्यावे असे निवेदन ता. अध्यक्ष बाळासाहेब सरवदे यांनी इंदापूर येथे शासकीय विश्रामगृहात केंद्रीय मंत्री रामदास आठवले साहेब यांना निवेदन दिले आहे.

पोलिस निरीक्षक सुर्यकांत कोकणे इंदापूर पोलीस स्टेशनला रुजु झाल्यापासून शहर आणि परिसरात अवैध धंदयांचा सुळसुळाट झालेला असून, इंदापूर शहर व परिसरात मटका, वैश्या व्यवसाय, गांजा तस्करी, गुटखा विकी, अवैध वाळू उपसा, याधंदयांना संरक्षण देवून महिन्याकाठी लाखो रुपयांची काळी माया गोळा करुन, पोलीसांचे जिव धोक्यात घालून स्वत: च्या आर्थिक फायद्यासाठी श्री. सुर्यकांत कोकणे पोलीसांना हप्ते गोळा करायला भाग पाडत आहेत. असे निवेदनात त म्हंटले आहे

इंदापूर येथे शासकीय विश्राम गृहात पत्रकारांच्या प्रश्नांना उत्तर देताना केंद्रीय मंत्री रामदासजी आठवले म्हणाले की मी स्वतः डि. वाय.एस.पी व एस. पी. यांच्यासोबत बोलणार आहे रिपब्लिकन पार्टीचा कार्यकर्ता हा नेहमी अवैध धंद्यांना विरोध करतो. माझे पाठबळ नेहमी कार्यकर्त्यांच्या पाठीशी आहे . परंतु पोलिसांनी सुद्धा आर पी आय च्या कार्यकर्त्यास पाठबळ दिले पाहिजे असे केंद्रीय मंत्री रामदास आठवले बोलताना म्हणाले

इंदापूर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक श्री. सुर्यकांत कोकणे व त्यांचे सहकारी यांच्या वर कारवाई करावी या साठी विधान परिषदेचे सभापती मा. राम शिंदे यांनी विशेष



पोलीस निरीक्षक यांना पाठवले कारवाई करावी असे पत्र विधान परिषदेचे सभापती मा.राम शिंदे यांनी निवेदनाची दखल घेत कार्यकर्त्यांच्या भावना ओळखून इंदापूर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक सूर्यकांत कोकणे व त्यांच्या सहकाऱ्यांवरती गुन्हा दाखल करण्याचे पत्र विशेष पोलीस निरीक्षक कोल्हापूर यांना दिले आहे.

भारतीय जनता पार्टी महिला मोर्चा पुणे जिल्हा उपाध्यक्ष श्रीमती शीतल साबळे यांनी विधान परिषदेचे सभापती मा.राम शिंदे हे इंदापूर येथे आले असता निवेदनाद्वारे त्यांच्यावर होत असलेल्या अन्यायाविरुद्ध इंदापूर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक सूर्यकांत कोकणे व सहकार्यांवरती कारवाई करण्याची मागणी केली होती.

निवेदनाची दखल घेत विधान परिषदेचे सभापती मा.राम शिंदे यांनी विशेष पोलीस निरीक्षक कोल्हापूर यांना पोलीस निरीक्षक सूर्यकांत कोकणे यांच्या वरती कारवाई करावी अशा आशयाचे पत्र दिले असून ते सध्या सोशल मीडिया वरती तुफान वायरल होत आहे तर गेल्या काही दिवसांपूर्वीच अँड राहुल मखरे यांच्यावरती सुद्धा सुडबुद्धीने गुन्हा दाखल केल्याची इंदापुरात जोरदार चर्चा सुरू आहे.

गेल्या कांहीं दिवसांपूर्वी इंदापूर पोलिसांचे स्टिंग ऑपरेशन करून पोलीस स्टेशन मध्ये अल्पवयीन मुलांना बंदिस्त खोलीत बंद करून ठेवणार्या पोलीस अधिकाऱ्यांचा व्हिडिओ पोलीस स्टेशनच्या आवारात शूट केला म्हणून पोलिसांनकरवी पत्रकार तानाजी कर्जे यांच्या वरती सुद्धा ट्रॉसिटी सारखे गंभीर गुन्हा दाखल केल्याची चर्चा इंदापूर तालुक्यातील जनतेत जोरदार रंगत होती.

इंदापूर येथे केंद्रीय मंत्री रामदासजी आठवले यांचा सत्कार करुन पोलीस निरीक्षक सूर्यकांत कोकणे यांच्या कार्यकाळात चाललेल्या अवैध धंद्या संदर्भात निवेदन दिले.

## थोडक्यात...

### अवंती नगरातून दुचाकी लंपास, गुन्हा दाखल

सोलापूर (प्रतिनिधी) अवंती नगर येथे हँडल लॉक करून ठेवलेली दुचाकी क्रमांक




एमएच.१३. डीएफ.८६७८ ही अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याची घटना १६ ते १७ डिसेंबर २०२४ दरम्यान घडली.याप्रकरणी मानकराम भवरूराम राईका (वय-३४,रा.लोकमंगल पतसंस्थेच्या समोर डी १, अवंती नगर) यांनी फौजदार चावडी पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे.त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. पुढील तपास पोलीस हेडकॉन्स्टेबल पाडवी हे करीत आहेत.

### मृत्यूस कारणीभूत ठरल्याप्रकरणी रिक्षा चालकावर गुन्हा दाखल

सोलापूर (प्रतिनिधी) मृत्यूस कारणीभूत ठरल्याप्रकरणी अज्ञात रिक्षाचालका विरुद्ध फौजदार चावडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.ही घटना ४ फेब्रुवारी रोजी रात्री सात वाजण्याच्या सुमारास मडके वस्ती येथे घडली.

याप्रकरणी लता शिवाजी क्षिरसागर (वय-५९,रा.अंबिका नगर,बाळे) यांनी फौजदार चावडी पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे.त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात रिक्षाचालका विरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.

याबाबत अधिक माहिती अशी की फिर्यादी यांचे पती शिवाजी क्षिरसागर (वय-६९) हे वरील ठिकाणावरुन पायी चालत रस्ता क्रॉस करत असताना अज्ञात रिक्षाचालकाने त्यांच्या ताब्यातील रिक्षा अविचाराने चालून फिर्यादी यांच्या पतीस धडक देऊन गंभीर जखमी करत मृत्यूस कारणीभूत झाला आहे.असे फिर्यादीत नमूद आहे.पुढील तपास पोलीस हेडकॉन्स्टेबल परीट हे करीत आहेत.

### कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांची माहिती

# श्री संत नामदेव पायरीचा दरवाजा चांदीने मढविला

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिरातील श्री संत नामदेव

**दरवाजासाठी सुमारे ३० किलो चांदी व इतर ४ लाख किंमतीच्या सोने चांदी वस्तू दान**

पायरीच्या दरवाज्याला नांदेड येथील भाविक अरगुलवार परिवारातर्फे चांदी बसवून देण्यात आल्याची माहिती मंदिरे समितीचे कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांनी दिली.

शंकर दिगंबर अरगुलवार व नरसिमलू दिगंबर अरगुलवार यांनी कै. दिगंबर तुकाराम अरगुलवार व कै. जनाबाई दिगंबर अरगुलवार या आपल्या आई-वडिलांच्या स्मरणार्थ सदरचे काम मोफत करून दिले आहे.

सदरचे भाविक हे श्री विठ्ठल रुक्मिणी मातेचे निस्सिम भक्त असून नियमित दर्शनासाठी येत असतात ते बिलोली जिल्हा नांदेड येथील रहिवासी असून, सदर दरवाजासाठी सुमारे ३० किलो चांदीचा वापर करण्यात आला असून, यासाठी सुमारे ३३ लाख ७५ हजार इतका मजुरीसह खर्च आला आहे. सदरकामी कारागीर म्हणून मे. जव्हेरी ज्वेलर्स, पंढरपूर यांनी सेवा दिली आहे. याशिवाय, त्यांनी २६ ग्रॅम सोने घंटन श्री रूक्मिणी मातेच्या चरणी तसेच १९.९ ग्रॅम सोने नाम व ४५ ग्रॅम चांदीचे जानवे श्री विठ्ठलाच्या चरणी अर्पण



केले असून, त्याची बाजार मूल्यानुसार सुमारे ४ लाख १८ हजार इतकी किंमत होत असल्याचे व्यवस्थापक मनोज श्रोत्री यांनी यावेळी सांगितले.

# सुंदरपुर येथे राष्ट्रीय नैसर्गिक शेती मिशन जनजागृती अभियान संपन्न

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : निफाड तालुक्यातील सुंदरपूर येथेराष्ट्रीय नैसर्गिक शेती मिशन योजनेअंतर्गत नुकतेच जनजागृती अभियान कार्यक्रम घेण्यात आला. याप्रसंगी शेतकऱ्यांना मंडळ कृषी अधिकारी जे आर शिरसागर यांनी नैसर्गिक शेतीचे वैशिष्ट्ये, नैसर्गिक शेतीचे फायदे, नैसर्गिक शेती पद्धती बाबत सविस्तर माहिती देऊन जीवामृत, बिजामृत, दशपर्णी अर्क कसे तयार करावे बाबत सविस्तर माहिती दिली.




राष्ट्रीय नैसर्गिक शेती अभियानांतर्गत ५०.०० हे एक गट तयार करून ०.४० हे क्षेत्राची निवड करून १२५ शेतकरी निवड करावी, त्यामधून दोन महिला कृषी सखी निवड करण्याचे आवाहन कृषी पर्यवेक्षक खेमनार टी बी यांनी केले. योजनेची प्रचार प्रसिद्धीबाबत कृषी सहाय्यक वाय बी पाटील यांनी मार्गदर्शन केले. याप्रसंगी पीक स्पर्धा राज्यस्तरीय विजेते शेतकरी शिवाजी बाजीराव सोमवंशी यांनी आपले मनोगत व्यक्त केले असून उपस्थित शेतकऱ्यांना ग्री स्टॅक ( फार्मर आयडी ) करणेबाबत दिनांक २८ २ २०२५ पर्यंत जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी तयार करून घ्यावे असे आवाहन मंडळ कृषी अधिकारी जे आर क्षीरसागर, कृषी पर्यवेक्षक खेमनार टी बी, कृषी सहाय्यक वाय बी पाटील यांनी केले. यावेळी शामराव सोमवंशी, बाबासाहेब सोमवंशी, राजेंद्र सोनवणे ,संदीप सोमवंशी, पंकज सोमवंशी ,एकबाल शेख, संतोष सोमवंशी, भाऊसाहेब सोमवंशी, आदी शेतकरी बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते


उपस्थितांचे आभार सरपंच विजय बाळासाहेब सोमवंशी यांनी मानले.

# किनीनवरे येथील भागवत कथेत राधा कृष्ण विवाह सोहळा संपन्न

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

औसा/प्रतिनिधी : औसा तालुक्यातील किनीनवरे येथे गेल्या ४२ वर्षापासुन पारंपारीक चालत असलेला अखंड हरिनाम सप्ताह साजरा केला जातो.

किनीनवरे येथील सप्ताह निमीत्त गावात प्रति पंढरपुर प्रमाने भाविकांनी किनीनवरे गाव गजबजुन गेले होते भागवताचार्य ह.भ.प परमेश्वरी दीदी परभने यांच्या सुश्राव्य वाणीतुन किनीनवरे येथील अखंड हरिनाम सप्ताहात भागवत कथेच आयोजन करण्यात आल असुन या सप्ताहात आज राधा कृष्ण यांचा विवाह सोहळा थाटामाटात पार पडला ,राधा कृष्ण च्या लग्नाला गावातील भाविकांच्या रुपाने वर्हाड अल होत, संगितमय वातावरणात मंगलअष्टके पार पडले व उपस्थीतांनी सावळ्या कृष्णाचे गोड असणार्या राधे सोबत लग्न लागले तो क्षण खरच अनुभवण्यासारखाच होता, लग्न मनल की वर्हाडी व कार्यक्रमात लगभग राधा व कृष्णाच्या वेशभुषेत दोन मुलींनी सहभाग घेतला व भाविकांच्या उपस्थीतीत राधा कृष्ण विवाह सोहळा संपन्न झाला ,ज्याप्रमाने पंढरपुरात विठ्ठल रखुमाई विवाह सोहळा साजरा केला जातो त्याच पद्धतीने हुबेहब गाजत वाजत संगीतमय वातावरणात आज किनीनवरे येथील अखंड हरिनाम सप्ताहात भागवत कथे निमीत्त राधा कृष्णाचा विवाह सोहळा पार पडला , यावेळी या किनीनवरे नगरीत काय वाजत गाजत सोन्याच बाशिंग लगिन देवाच लागत या भक्तीमय सुरेल गाण्याने अवघी किनीनवरे नगरी दुम दुमुन गेली होती यावेळी



,लातुर येथील न्युरो सर्जन डॉ . हनमंत किनीकर ,ड किरण जाधव , जिल्हा परीषद सदस्या संगीता शिंदे ,माधव भिसे ,चेअरमन सतीश मरुरे ,सरपंच अदिनाथ जाधव ,उपसरपंच हिरा किनीकर ,भिमा शिंदे,श्रीमंत जाधव ,प्रतिक पाटील सह किनीनवरे गावातील ग्रामस्थ उपस्थीत होते ,

### ३२ किलो गांजए, एक कारसह १४,४९,६८० रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त

### पंढरपूर शहरात पेट्रोलिंग दरम्यान कारवाई

# पंढरपूर शहर गुन्हे प्रकटीकरण शाखेची गांजा वाहतुकीवर पुन्हा मोठी कारवाई

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : दिनांक २३/०२/२०२५ रोजी होणे प्रकटीकरण शाखेचे अंमलदार व महिला पोलीस अंमलदार व्हीआयपी बंदोबस्ताच्या अनुषंगाने पंढरपूर शहरात पेट्रोलिंग करीत असताना त्यांना पंढरपूर मंगळवेढा रोडवरील लिंगायत स्मशानभूमी समोर जागेत एक होंडाई कंपनीच पांढऱ्या रंगाची आय २०, गाडी नंबर एम. एच १३ बी एन.१६२२ रात्री २०/४५ सुमारास संशयात रीतीने उभा असलेले दिसले संशयित असलेली दिसल्यास त्या गाडीला पोलिसांनी गराडा घातला गाडीसोबत गाडी चालक व पाठीमागील सीटवर तीन महिला बसलेल्या दिसल्या.

सदर गाडीची संकेतरित्या चौकशी केली असता गाडीच्या डिके मधील काही पाकिटे दिसली होती शील बंद होती त्याचा उग्र व आंबट वास येत होता गाडीसह तीन महिला व एक पुरुष संशयितरित्या सदर व्यक्तींना पंढरपूर शहर पोलीस ठाणे येथे आणून चौकशी केली असता ३२,१३४, किलोग्रॅम. वजनाचा ६,४२,६८०/रुपये किमतीचा गांजा असलेल त्यांच्या विरोधात पंढरपूर शहर पोलीस ठाणे गुन्हा रजिस्टर नंबर १२७/२०२५ एन डी पीएस कायदा कलम(बं)!!(क) गुन्हा दाखल केला असून०३ महिला व ०१ पुरुष, एकूण ०४ आरोपींना अटक केली आहे.

सदर आरोपीकडून खालील मुद्देमाल जप्त केला आहे

१)६,४२,६८९/रुपये किमतीचा प्रतिबंधित गांजा २)८,००,०००/रुपये किमतीची पांढऱ्या रंगाचे होंडाई कंपनीचेआय.२०. गाडी नंबर एम एच १३.बी.एन.१६२२. एकूण १४,४२,६८०/रुपये किमतीचा मुद्देमाल आरोपीसह कार सह ताब्यात घेतला.

सदरची उल्लेखनीय कामगिरी ही मा. पोलीस आयुक्त श्री अतुल कुलकर्णीसो. अप्पर पोलीस अधीक्षक श्री प्रीतम कुमार यावलकर. सो. उपविभागीय पोलीस अधिकारी पंढरपूर विभाग श्री अर्जुन भोसले, वरिष्ठ पोलीस निरीक्षक पंढरपूर शहर पोलीस ठाणे श्री विश्वजीत घोडके,सो. यांच्या मार्गदर्शनाखाली पंढरपूर शहर कोणी प्रकटीकरण शाखेचे प्रभारी सहाय्यक पोलीस निरीक्षक अशीच कांबळे, श्रेणी पोसाई. राजेश गोसावी,सा. पो.फो. शरद कदम, कल्याण धावणे, सुरज हेंबाडे, सिग्मा गोडसे, सचिन हेंबाडे, प्रसाद आवटी, पोलीस नाईक सचिन इंगळे, शहाजी मडले, समाधान माने, बजरंग बिचकुले, रेश्मा सांगोलकर, निलेश कांबळे, सायबर सेलचे रतन जाधव यांनी काम पाहिले व पुढील तपास श्री भारत वाघे हे करीत आहेत.

सदर आरोपींची नावे व पत्ता

१) अमोल हनुमंत पवार रा. गाथाडे प्लॉट पंढरपूर जिल्हा सोलापूर

२) सुरेखा प्रांत पवार रा. गाताडे प्लॉट पंढरपूर जिल्हा सोलापूर.

३) मैनाबाई महादेव जाधवर.रा. बेगर वस्ती राहणार तुंगत तालुका पंढरपूर




४) लखाबाई प्रल्हाद पवार देगाव तालुका पंढरपूर. राहणार मारुती मंदिराजवळ